# PUC II Year Annual Examination 2022
## SCHEME OF VALUATION
## Sub. - Marathi
## Sub Code – 07 ( NS)

१. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा.

**१. ग्रामीण जीवनातील व्यथा–** **10**

निबंधाची सुरूवात आकर्षक असावी, मुद्देसूद मांडणी असावी, सुभाषिते, म्हणी, वाक्यप्रचार, सूवचने यांचा वापर असावा. विद्यार्थ्यांची मते, विचार, प्रगट झालेले असावेत, विषयानुसार मांडणी व अभ्यास असावा, आशयानुसार कारणे व उपाय असावेत, तर्कबध्द मांडणी असावी, परिच्छद असावेत, व्याकरणदृष्ट्या वाक्यरचना, शुध्दलेखनाकडे लक्ष असावे, निबंधाचा समारोप आकर्षक असावा, वर्तमानकाळातील समाज पर्यावरण या सर्वांचे प्रतिबिंब पडलेले असावे.
भारत हा खेडयांचा देश, ‘ खेडयाकडे चला ’ असे महात्मा गांधीनी म्हंटले होते स्वातंत्र्यपूर्व काळात ग्रामीण जनतेचा विकास नाही. भारताला स्वातंत्र्य मिळाले.ग्रामीण समाजाचा विकास होऊ लागला. स्वातंत्र्यप्राप्तीनंतरही आज ग्रामीण समाजात अनेक समस्या , सामाजिक, शैक्षणिक तसेच अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य, शिक्षण, पाणी, रस्ते, दारिद्रय अशा अनेक समस्या, व्यथा ग्रामीण जीवनात आढळतात. पायाभूत सुविधा नसल्यामुळे ग्रामीण समाजाचा विकास नाही. आजही दरडोई उत्पन्न कमी, रोजगारांच्या संधी जीवनात नाहीत. शहराकडे जातात. जलसिंचनाच्या सोयी नसल्यामुळे उत्पन्न मिळत नाही. महापूर , दुष्काळ या नैसर्गिक आपत्ती, कर्जाचा डोंगर, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, शेतमालाला किफायतशीर किमंत नाही. सरकारच्या विविध योजना पण फारसा फरक नाही. जागतिकीकरण, खाजगीकरण , उदारीकरण त्यांचा परिणाम, सरकारने विविध उपाय योजना, अमंलबजावणी करणे, रोजगारांची संधी उपलब्ध, राहणीमानाचा दर्जा सुधारणे, पायाभूत सुविधा उपलब्ध करून देणे.

**२ मी पाहिलेली जत्रा** – **10**

निबंधाची सुरूवात आकर्षक असावी, मुद्देसूद मांडणी असावी, सुभाषिते, म्हणी, वाक्यप्रचार, सूवचने यांचा वापर असावा. विद्यार्थ्यांची मते, विचार, प्रगट झालेले असावेत, विषयानुसार मांडणी व अभ्यास असावा, आशयानुसार कारणे व उपाय असावेत, तर्कबध्द मांडणी असावी, परिच्छद असावेत, व्याकरणदृष्ट्या वाक्यरचना, शुध्दलेखनाकडे लक्ष असावे, निबंधाचा समारोप आकर्षक असावा, वर्तमानकाळातील समाज पर्यावरण या सर्वांचे प्रतिबिंब पडलेले असावे

परीक्षा संपलेली, अभ्यासाचा ताण नाही. शाळांना सुटी होती. मामाच्या गावी जत्रा. मामाच्या गावाला जायचे, जत्रेचा तसा कधी अनुभव घेतला नव्हता. मामाच गाव निसर्गाच्या सानिध्यात, अवती भोवती झाडे, गावा शेजारी वाहणारी नदी, कौलाची घरे, एक आगळ वेगळ अस गाव होत. जत्रेच्या आदल्या दिवशी गावात पै पाहुणे मंडळी, गाव गजबजलेल होत. सकाळी प्रत्येक अंगण सारवून, रांगोळी, नविन कपडे लहान मुले एकदम आनंदीत, गावाच्यामध्ये देवीचे देऊळ रंगवलेल, रोषणाई केलेली , घरात पुरण पोळी नवैध, देवीला लोकांनी गर्दी केलेली. देवळा समोर मेवा – मिठाईची दुकाने पाहताच खावे वाटे. देवीचे दर्शन, पटागंणात

जत्रा भरलेली होती. पाळणा, खेळण्यांची दुकाने, मेवा मिठाईची दुकाने आई वडील आपल्या मुलांना घेऊन जत्रेत फिरत, मुले पाळण्यात बसत, पिंपाणी वाजवत प्रत्येकाच्या  चेहऱ्यावर आनंद, कुस्त्याही होत्या. सगळा दिवस आनंदात गेला. घरात पाहुणे मंडळी, त्यांच बोलण सगळ गाव भरल्यागत वाटत होत. पण स्वच्छतेकडे व आरोग्याकडे लक्ष देणे गरजेच.

३ **पर्यावरण संतुलन काळाची गरज** – 10

निबंधाची सुरूवात आकर्षक असावी, मुद्देसूद मांडणी असावी, सुभाषिते, म्हणी, वाक्यप्रचार, सूवचने यांचा वापर असावा. विद्यार्थ्यांची मते, विचार, प्रगट झालेले असावेत, विषयानुसार मांडणी व अभ्यास असावा, आशयानुसार कारणे व उपाय असावेत, तर्कबध्द मांडणी असावी, परिच्छद असावेत, व्याकरणदृष्ष्या वाक्यरचना, शुध्दलेखनाकडे लक्ष असावे, निबंधाचा समारोप आकर्षक असावा, वर्तमानकाळातील समाज पर्यावरण या सर्वांचे प्रतिबिंब पडलेले असावे

वर्तमान काळात पर्यावरण समस्या – आंतरराष्ट्रीय समस्या, तपमान वाढत आहे, उष्णता, नैसर्गिक आपत्ती, महापूर, ढगफुटी प्रकार, जंगलाचे प्रमाण कमी, कार्बनडाय ऑक्साइडचे प्रमाण वाढत आहे. ओझोनचा थर विरळ होत. प्राणी, जलसृष्टी व वन्यसृष्टी कमी होत आहे. जमिनीची धूप वाढत आहे. पर्जन्यमान अति किंवा काहीच नाही, दुष्काळ पडत आहे. ऑक्सीजन, मानव हा ही निसर्गाच्या साखळीचा भाग आहे. जल, वायू, ध्वनी, माती , प्रदूषण, निसर्ग आणि मानव, संतानी निसर्गाला महत्व, भारतीय संस्कृतीत निसर्गाला महत्व, सेंद्रीय शेती, पर्यावरण रक्षण, नद्यांचे प्रदूषण रोखणे पर्यावरणासंबंधी कायद्याची योजना, अमंलबजावणी करणे. एक झाड मानसाला अनेक गोष्टी देते. स्वच्छता राखणे, सौरऊजाचा वापर करणे, मोटर सायकलचा वापर कमी करणे, पर्यावरणाचं सवंर्धन केले तरच मानव सुखी राहील.

4. माझा मुलगा रुसून घर सोडून जात आहे. असे म्हातारीने गोसाव्यापुढे दु:ख व्यक्त केले. 1
5. वीरराणी कित्तूर चन्नम्माच्या वडिलांचे नाव धुळाप्पा गौडा व आईचे नाव पद्मावती होते. 1
6. एकोणिसाव्या शतकातील बहुजन समाजाला लागलेले दोन मोठे रोग म्हणजे एक अज्ञान व दारिद्रय होय. 1
7. डॉ. बाबासाहेब आंबेडकराचा जन्म राजपुतान्यातील महू या ठिकाणी झाला. 1
8. मुकांबिका हे आजीला नाव पणजोबांनी ठेवले होते. 1
9. गं. बा. सरदाराचा जन्म ठाणे जिल्हयातील जव्हार या गावी झाला. 1
10. ‘ जगाव की मराव’ असा प्रश्न अप्पासाहेब बेलवलकरांच्या पुढे पडला होता. 1

**ब. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नांचे सविस्तर उत्तर लिहा. 6**

11. मराठियाची तो इज्जत वाचणार नाही. या ऐतिहासिक पत्रातून छत्रपती शिवाजी महाराजांनी मुक्काम मौजे दलवटणे, ता. चिपळूण या ठिकाणी असणाऱ्या सैनिकांना सूचना केलेल्या आहेत. छावणीला जे काही लागेल त्याची व्यवस्था केलेली आहे. तुम्ही मनात येईल तसे धान्य, गवत व इतर जीवनाआवश्यक वस्तू वापरल्या तर जास्त पावसात काही मिळणार नाही. घोडी उपाशी राहतील, मरायला लागतील, घोडी तुम्हीच मारली असे होईल.  छावणीतील सर्व वस्तू संपल्यानंतर आसपास राहणारे कुणबी त्यांच्याकडे तुम्ही धान्य, भाकर , गवत भाजी मागाल . कसेबसे जीवन जगणारे कुणबी तेथून जाऊ लागतील. ते उपाशी राहतील .

मोगलापेक्षा हे लोक वाईट आहेतअसे वाटेल, तळतळाट लागेल. पागेत राहणारा सैनिक असो अगर गावात राहणारा सैनिक असो त्याने कुणब्याच्या गवताच्या काडीला ही हात लावू नये. कोठारातून कारकून जे देईल तेवढेच घ्यावे. जास्त लागत असेल तर बाजारात जावे. रास विकत घ्यावी. कोणावरही अन्याय करू नये. कारकून देईल त्याप्रमाणे घेतल्यास काही कमी पडणार नाही. कारकूनाकडे काही मागू नये. कोठारात शिरू नये. स्वयपाक करण्यासाठी , तंबाखू, भाजण्यासाठी आग हवी असल्यास आणताना कोठाराला पागेला आग लागेल पागा बुडाली तर काही मिळणार नाही. रात्रीस दिवा असेल उंदीर वात नेईल पागेला आग लागेल. सतत फिरत राहणे. या प्रमाणे वर्तणूक केली नाही तर मराठियाची इज्जत वाचणार नाही. अशा सूचना केल्या आहेत.

१२. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे तीन गुरू आहेत. १ गौतम बुध्द, २. संत कबीर ३) महात्मा जोतिराव फुले होय.

**गौतम बुध्द** – दादा केळूसकरानी बक्षिस म्हणून बुध्दाचे चरित्र दिले होते. बुध्दाच्या तत्वज्ञानाचा प्रभाव पडला. बुध्द धर्म जातीयव्यवस्था वर्ण्यव्यवस्था नाकारणारा होता. अहिंसावादी होता. जगाचे कल्याण बुध्द धर्म करू शकेल. माणुसकी, मानवता हा धर्म होता. तेथे भेदभाव नाही. सर्व समान आहेत. श्रमण, भिक्षू, ब्राम्हण, भंगी असोत सर्व एकच , सर्व नद्या सागराला मिळाल्यानंतर त्याची ओळख संपते. महासागराशी एकरूप होतात. तसा बौध्द धर्म आहे. धर्मातील कर्मकांड व अंधश्रद्धा नाकारणारा बौध्द धर्म आहे. डॉ. आंबेडकरांनी बौध्द धर्म स्वीकारला.

**संत कबीर** –डॉ. आंबेडकरांचे वडील कबीरपंथीय होते. त्यामुळे कबीराच्या जीवनाचा व तत्वज्ञानाचा मोठा परिणाम झाला आहे. कबीर मानवतावादी होता. ‘माणुस होन कठीण है । तो साधू क्या बने! जातीव्यवस्था, धर्मातील अंधश्रद्धा, कर्मकांड नाकारणारा संत कबीर होता.

**महात्मा जोतिराव फुले** – शिंपी, कुंभार, न्हावी, कोळी, महार, मांग यांना माणुसकीचे धडे महात्मा जोतिराव फुल्यानीच दिले. स्वातंत्र्य , समता, मानवता, बंधूभाव या मूल्यांना त्यांनी महत्व दिले. जातीयव्यवस्था व वर्ण्यव्यवस्था पूर्ण नाकारली, स्त्री शिक्षणाला महत्व दिले. अठरापगड जातीना जवळ केले. मानवता हाच धर्म प्रस्तापित केला. कर्मकांड व अंधश्रध्दा नाकारली. गौतम बुध्द, संत कबीर व महात्मा जोतीराव फुले यांच्या तत्वज्ञानाचा, विचारांचा, कृतीचा, संस्कारांचा प्रभाव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्यावर दिसून येतो.



१३. लेखक गं. बा. सरदार यांचा जन्म २ ऑक्टोंबर १९०८ रोजी ठाणे जिल्ह्यातील जव्हार या गावी झाला. जव्हार हे निसर्गात असलेल गाव. आदिवासी बांधव राहत. वडील व्यापार व सावकारी सुध्दा करत. बाबा साहसी आणि शिस्तप्रिय, व्यवहार सचोटीने केला. जव्हारला आदिवासी वसतिगृह बांधायची कल्पना वडिलांची होती. त्यांनी पंधरा हजार रुपयाची देणगी दिली होती. सगळ्या जातीच्या बांधवांना स्वत:च्या घरी जेवायला बोलवत. समत्ववृत्तीचा ठसा संस्कार माझ्यावर झाला.

प्राथमिक व माध्यमिक शिक्षण जव्हारलाच झाले. उच्च शिक्षण पुण्यात परशुराम भाऊ महाविद्यालयातून एम. ए. पदवी संपादन, पुण्यात एस. एन. डी.टी. कॉलेज मध्ये मराठीचे अध्यापन केले. विद्यापीठाच्या मराठी विभागाचा प्रमुख म्हणून १९६८ साली निवृत्त झालो.

खालीलपैकी कोणत्याही दोहोंचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा.

14. **संदर्भ :** पाठाचे नाव – श्री गोविंदप्रभूंच्या लिळा लेखक– म्हाइंभट 3
पाखाला बाळक पांगुरवणे – या लिळेतील ही घटना आहे.

**स्पष्टीकरण** – एक आई पाणी आणण्यासाठी जात होती. तिच्या घरी वडील व धाकुटे कोणीही माणूस नव्हते. तिला छोटेसे बाळ होते. तिच्या पुढे समस्या होती. त्यावेळी गोसावी आले. तिने विनंती केली व पाणी आणण्यासाठी गेली. गोसाव्याने बाळाला खेळविले व बाळाला जाड वस्त्राखाली झोपविले . गोसावी निघून गेले. आई पाणी घेऊन आली. घरभर बाळाला शोधले, पण बाळ दिसले नाही. त्यावेळी आईने शेजारणीला वरील प्रश्न विचारला.

15. **संदर्भ** : पाठाचे नाव – शिक्षण हाच आमचा तरणोपाय लेखक – डॉ. जयसिंगराव पवार
राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य 3
**स्पष्टीकरण** – शिक्षण हिच खरी समाजाची संजीवनी आहे. शुद्रातिशूद्रांची ऐहिक व बौध्दीक गुलामगिरीतून मुक्ततेसाठी शिक्षण महत्वाचे आहे. त्यासाठी त्यांना प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत दिले पाहीजे. त्या शिवाय समाजाची प्रगती, विकास होणार नाही. हे ओळखून राजर्षी शाहू महाराजांनी 1917 साली वरील कायदा केला.

16. **संदर्भ** – पाठाचे नाव– सतीचे शस्त्र, लेखक– श्रीपाद महादेव माटे 3
व्यक्तीचित्रणात्मक पाठ, सईचे करारीपण व धाडस, शब्द हेच शस्त्र
**स्पष्टीकरण :** सईच्या पतीचा मृत्यू झाला होता. ती विधवा होती. ती चार घरची कामे करत होती. कामाला जाणाऱ्या रस्त्यावर बाळा गंवडी काम करत होता. तो खोव्या नजरेचा व चावट स्वभावाचा होता. त्याने सईला पाहताच ‘ कुठल पाखरू हाय र’ असे मोठयाने म्हणाला, सईला समजले. तिला राग आला तिने बाळा गवंडयाला वरील वाक्य उदगारले.

17. संदर्भ – पाठाचे नाव – जीवनाची सायंकाळ, लेखक– वि. वा. शिरवाडकर
‘ नटसम्राट’ या नाटकातील उतारा, आप्पासाहेबाचा करारीपणा 3
स्पष्टीकरण _ आप्पासाहेब व कावेरी दोघेजण नलूच्या घरी राहत असतात. नलूच्या पतीचे पाकीट तिजोरीतून नाहीसे होते. नलूला वाटते आपल्या घरात चोरी झाली आहे. म्हणून सर्व नोकरांची झडती घेते. शेवटी नलू अप्पासाहेब व कावेरीच्या खोलीत येते. खोलीत शोधा शोध करते व नलू जाते. विठोबा येतो पाकीट चोरीला गेल्याचे सांगतो. अप्पाना समजते, चोरीचा संशय आपल्यावर नलूने घेतला आहे. त्यावेळी अप्पासाहेब नलूला वरील प्रश्न विचारतात.

ड) खालीलपैकी कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा. 4

18. वीरराणी कित्तूर चन्नमाचा पती राजा मल्लसर्ज यांच्या निधनानंतर कित्तूर राणी चन्नम्माला एकपूत्र होता. तो लहान असताना वारला, रूद्राम्मा हिचा पूत्र शिवलिंग रूद्रसर्ज याला गादीवर बसविण्यात आले. पण तो अल्पवयात मरण पावला. दत्तकपूत्र घेतल्याशिवाय पर्याय नव्हता. शिवलिंगप्पा ऊर्फ सवाई मल्लसर्ज 1 सप्टेंबर 1824 साली दत्तक घेण्यात आले. कलेक्टर थॅकरे दत्तक विधी नाकारला. त्याला कित्तूरचा किल्ला व खजिना हवा होता. संघर्ष सुरू झाला. चन्नम्मा राणीने सर्व सरदारांना सुभेदारांना बैठक घेऊन कल्पना दिली. इंग्रजाच्या लढाईचे आव्हान स्वीकारले थॅकरेने आव्हान दिले. 24 मिनिटांत

दरवाजा उघडला नाही तर तोफाचा मारा करून उध्वस्त केला जाईल.  दरवाजा उघडला नाही. अचानक किल्ल्याचा दरवाजा उघडला. हातात नंग्या तलवारी घेऊन राणी चन्नम्माचे सैनिक बाहेर पडले. तोफखान्यावर तुटून पडले. इंग्रजाचे लष्करी आधिकारी मारले. इंग्रजी तोफावर तुफानी हल्ला चढविला. पराभव होत आहे असे वाटताच थॅकरे युध्दात उतरला. त्यावेळी साधुनाव्वर बाळाप्पा नेम धरून थॅकरेवर गोळी झाडली. थॅकरे खाली पडला. एका सैनिकाने मुंडके उडविले. थॅकरे मेला थॅकरे मेला अशा प्रकारे थॅकरेचा पराभव केला. किल्ल्याच्या तटावर दिपोत्सव साजरा केला.

4

19. राजर्षी शाहू महाराजाचा स्त्री विषयक दृष्टीकोन पुरोगामी होता. संस्थानाच्या मुलींची शिक्षण व्यवस्था पाहण्यासाठी एक खास शिक्षणाधिकाऱ्यांचे पद निर्माण केले. रखमाबाई केळवळकर यांची नेमणूक केली.  शिक्षणकार्याला गती दिली. मुलांमुलींच्या शाळा होत्या. मुलींसाठी स्वतंत्र शाळा, मागासलेल्या, दुर्गम भागात मुलींच्यासाठी शाळा, मुलीने मुलांबरोबर शिक्षण घ्यावे यासाठी उत्तेजन वर्गात जास्त मुली पास झाल्या तर शिक्षकांना बक्षिसे दिली जाऊ लागली. प्रौढ स्त्रियांना शिक्षणाची व्यवस्था, हुशार मुलींना शिष्यवृत्या, राजाराम कॉलेज मध्ये सर्व मुलींना मोफत शिक्षण. रखमाबाईच्या कन्या कृष्णाबाई यांना वैद्यकीय शिक्षणासाठी मुंबईला पाठविले. नंतर परदेशात वैद्यकीय शिक्षणासाठी पाठविल्या.  परदेशात वैद्यकीय शिक्षण घेऊन परत येणाऱ्या दुसऱ्या कृष्णाबाई.

4

20. सतीचे शस्त्र या पाठाचे लेखक श्री. म. माटे, सईचे व्यक्तीचित्रण. सईचा पती निधन पावल्यानंतर सईचा मुलगा नामा यासाठी तरी जगले पाहिजे. म्हणून तिने आणखी चार घरची कामे घेतली. कामधंदा आटोपून जाण्याच्या वाटेवर एका घराचे काम चालू होते. तिसऱ्या मजल्यावर बाळा गवंडी काम करत होता.  बाळा गवंडी धष्टपुष्ट, काळा कुळकुळीत, रंगेल स्वभावाचा, हाताखालच्या बायकांना ए काकी, ए नानी हाका मारत. खोव्या नजरेचा चावट स्वभावाचा होता. सई त्याच रस्त्याने जात होती तिला पाहताच ‘ कुठल पाखरू हाय रं? म्हणाला सईला समजले तिने, शब्दाच्या शस्त्राने त्याला अद्दल घडवली मालिक मरून गेल्यात पन त्यांचा जोडा जपून ठेवलाय म्या! जर का पुना असं बोललास तर त्याच जोडयाने  तुझ पैलवानांच ढ्यार फोडल्याबिगर ऱ्हायची न्हाय!

4

21 आजीचे भाष्य  लेखक डॉ. शिवराम कारंथ, आजीचे व्यक्तीचित्रण, वडीलांची आत्या आजी. आजी लग्न होऊन दुसऱ्यांच्या घरी पिंपळ, चिंच, फणसाच्या झाडासारखी स्थायिक व्हायला हवी होती. पण झाले नाही. कोल्लूरच्या मूकांबिका देवीच्या स्मरणार्थ पणजोबांनी तिचे नाव मुकांबिका ठेवले. तिला मुकी म्हणत . दहा वर्ष पूर्ण होण्यापूर्वीच तिचा विवाह, लहान वयात लग्न, लग्नानंतर सहा महिन्यात नवरा फेफरे येऊन वारला. पणजोबांनी तिला घरी आणले. कायमचीच स्थायिक झाली. तिने घरकामात आळशीपणा केला नाही. तिचा स्वभाव आंबट गोड होता. गावातून कधी बाहेर पडली नाही. आजोबांनी ‘चल काशी यात्रेला जाऊन येऊ’ म्हंटल तर ती म्हणाली ‘ तेथला देव येथेही आहे’. बुध्दीने तल्लख होती. स्वत:शीच पुटपुटत तिच्या तोंडून देव, ईश्वर, परमात्मा, ब्रम्हा असे शब्द बाहेर पडत, तिचा पुर्नजन्मावर, स्वर्ग, नरक यावर विश्वास नव्हता. देऊळ, देव शाश्वत नाही. माणसाने देवाकडे काही मागू नये, कारण वन्यप्राणी देवाकडे कधीच काही मागत नाहीत.

खालीलपैकी कोणत्याही पाच प्रश्नांची एक ते दोन वाक्यात उत्तरे लिहा.

22. आरसा आंधळ्यासाठी उपयोगी नाही. 1
23. संसाराला मृगजळ व अभ्रीची छाया उपमा दिलेली आहे. 1
24. विठ्ठलाच्या नामस्मरणाने महापापी , दुराचारी वाल्हा कोळी यांचे रक्षण केले आहे. 1
25. सासुरवाशीण भवानीआईची प्रार्थना करत आहे. 1
26. नलराजाला तू थोर दयासिंधू म्हंटले आहे 1
27. आई जन्माची शिदोरी असते 1
28. सखी येताना जात विसरून आली होती 1

**ब. खालीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा** 6

29. संत ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक परमेश्वरांकडे पसायदान मागितलेले आहे. आता विश्वात्मक परमेश्वर वागयज्ञ , वाणीरूप यज्ञाने संतुष्ट होऊन पसायदान द्यावे. दृष्ट्यांचा दृष्टपणा नाहीसा कर त्यांच्या अंगी चांगले कर्म, चांगल्या गुणांची वाढ होऊ दे. सर्व प्राणीमात्राचा, माणसांचा एकमेकाशी मैत्री होऊ देत. दु:खी कष्टी लोकांच्या जीवनातील अंधकार नष्ट होऊ दे. त्यांचे कर्म चांगले घडू दे, जे जो इच्छा करेल त्याची पूर्ण होऊ दे सर्वमानवजातीची. निरंतर पृथ्वीवर ईश्वर निष्ठाची मांदियाळी आहे. त्याची निरंतर या भू मंडळी भेट घडू दे. संत हे कल्पतरू आहेत. ते चिंतामणीचे गाव आहेत. त्याचे बोलणे साक्षात अमृत आहे. संत निष्कंलक आहेत. सूर्यासारखे आहेत. पण तापहीन आहेत. ते सर्व सदा सज्जन आहेत. ते सोयरे होऊ देत, असा सर्व सुखी असणारा तिन्ही लोकांत आदि पुरूषाचे ( परमेश्वरांचे ) अखंड भजन. जे ग्रंथात सांगितल्या प्रमाणे जीवन जगतात, चांगले कार्य करतात. त्यांची भेट होऊ दे. मग विश्वात्मक परमेश्वर प्रसन्न होऊन कृपाप्रसाद दिला ज्ञानेश्वर आनंदीत झाले.

6

30. सुंदर हिरवे माळ चहूकडे सुंदर हिरवे माळ आहे. आकाशात घनमाला जमली आहे. झिम झिम पाऊस पडत आहे. ग्रीष्म ऋतुचा ताप निवला . शेतीतून कोंभ येऊ लागले. बोरवनाची सुकलेल्या पानांना नवीन पालवी आली. बाभळी चैतन्याने, आंनदाने डोलू लागल्या आहेत. मोठया मोठया दगडाखाली हिरवळ आली आहे. हिरवळ मराठमोळी तरूण कुमारी लाजून लडिवाळे पाहते तसे पाहत आहे. इकडे– तिकडे भोवती हिरवेपण दिसून येत आहे. पानावर पडलेले पावसाचे थेंब. त्यावर पडलेले सूर्यप्रकाशाच्या किरणानी माळावरच्या वनराणीला नजरानांच दिला आहे. सुकलेल्या ओढ्यातून धावपळ करीत पाणी वाहत आहे. त्यातून गीत मोहीनीचा मंजूळ आवाज जसे नर्तकी पायामधील चाळ वाजवित आहे. सांयकाळी गुरे पोट भरून परत गावाकडे जात आहेत. त्यांच्या सावल्या पडलेल्या आहेत. क्षितीजांवर वेगवेगळ्या रंगाची उधळण आहे. सह्याद्री पर्वत रांगेत एकटाच राजमहाल एटीत उभा आहे. राने, गुरे–वासरे, झाडे, रानपाखरे सगळ्यांना समाधान वाटत आहे. पण शेतकरी कष्ट करून ही उपाशी आहे.

6

31. गोफ ही कविता गोविंदाग्रजानी लिहीलेली आहे. गोफ हे प्रेमाचे प्रतिक आहे. या कवितेतील सखा आणि सखी प्रेमाचे पदर आणतात. दोघांच्या प्रेमाच्या पदरांनी ( भावनांनी) प्रेमाचा गोफ विणत जातो. प्रेमाचा खेळ रंगत जातो. त्याची नजरधुंद होते. अवती– भोवती असणाऱ्या गोष्टींचा विसर पडतो. कोणी निंदा , स्तुती हसले , रडले तिकडे पाहिले नाही. दोघेजण प्रेमात पूर्ण बुडाले होते. पण दैवाचा खेळ निराळाच होता. सखीला प्रेमाचा खेळ नकोसा झाला. ज्या खेळाने जीव रंगला होता. त्याचा तिला कंटाळा आला .

प्रेमाचा गोफ उलघडण्याचा कठीण  काळ आला. सख्याला फार दुःख झाले, कस सांगू प्रेमाचे धागे हळू हळू ओढ. एवढी का घाई आहे. चुकून भलताच धागा ओढलास आणि तुटला तर दुःख होईल. जीव जाईल थांब घाई करू नकोस, शांत बुध्दीने सोडवू. एक ही पदर तुटला नसला पाहिजे नाही तर जग आपल्याकडे पाहून हसेल. खरंच प्रेमासाठी एकत्र आलो होतो की दूर होण्यासाठी. प्रेमाचा पीळ कायम दुःख देत राहील. आज दुःखाने निस्तरणे नशिबी आले आहे. व्यवहारात जोडणे कठीण तोडणे सोपे वाटते. पण प्रेमामध्ये जोडणे सोपे तोडणे कठीण वाटते हा अनुभव आला.

क) खालीलपैकी कोणत्याही दोहोंचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा. 3

32. संदर्भ _वचनाचे नाव बसवेश्वरांचे वचनामृत संत बसवेश्वर

स्पष्टीकरण – चोरी करू नये, हत्या करू नये, खोटे बोलू नये, कोप करू नये, तिरस्कार करू नये. निंदा, हेटाळणी करू नये. हिच खऱ्या अर्थाने अतरंग बहिरंग शुध्दी. ह्या विचाराने जीवन जगू लागलो तर संत बसवेश्वर म्हणतात. कूडलसंगम देवास प्रसन्न करण्याचा हाच मार्ग आहे.

33. **संदर्भ** – अभंग– किती हे सुख मानिती संसाराचे संत सोयराबाई 3

**स्पष्टीकरण**– या ऐहिक संसाराविषयी तुला किती आसक्ती आहे. संसाराचे सुख किती मानतोस ते काही सत्य नाही. संसाराचे सुख हे मृगजळासारखे व अभ्रीच्या छाये सारखे आहे. त्यावर विश्वास ठेवू नकोस. मी आणि माझे यासाठी जगत आहेस. त्याचा डोक्यावर भार घेऊन जीवन जगत आहेस पण तू पुढचा काहीच विचार करत नाहीस.

34 संदर्भ – भारूड – सत्वर पाव गे मला संत एकनाथ 3

स्पष्टीकरण :– हे भारूड असून मनोरंजन व भक्ती दोन्ही आहे. माणसांच्या मनातील षडरिपू . गेले तर निर्मळ मनाने परमेश्वरांची भक्ती करता येते. हा संदेश द्यायचा आहे. सासुरवाशीन भवानीआईची प्रार्थना करत आहे. जर प्रसन्न झालीस तर रोडगा अर्पण करेन. सासरा गावी गेला त्याला तिकडेच खपव. सासू जाच करते लवकरच निर्दाळी, जाऊ फडफड बोलते तिला बोडकी कर, नंणदेचे पोर किर किर करते त्याला खरूज होऊ दे सगळे षडरिपू मनातले नष्ट कर, अशी प्रार्थना करत आहे.

35. संदर्भ कविता – सखी कवयत्री – हिरा बनसोडे 3

स्पष्टीकरण – सखी या कवितेत दलित स्त्रीची मैत्रीण सवर्ण समाजातील असते . ती दलित स्त्रीच्या घरी जेवायला येणार असते सखीला वाटते ती आपल्या घरी येते म्हणजे जात विसरून येत आहे. विषमतेची परंपरा मोडीत येत आहे. खरंच सखीच मन आभाळा एवढे आहे आणि ती आपल्या झोपडीत येत आहे हे पाहून सखी आपल्या सवर्ण सखी विषयी म्हणते.

ड) खालीलपैकी कोणत्याही दोहोवर टीपा लिहा. 4

36. नलराजाच्या बागेत विहार करण्यासाठी हंस पक्षी जातो. नलराजाचे लक्ष सोनेरी हंस पक्ष्याकडे जाते. राजाच्या मनात हंस पक्ष्याच्या सोन्यापासून अलंकार करावेत असे वाटत. हंस पक्ष्याला पकडतो त्यावेळी हंस पक्षी सांगतो माझ्या म्हाताऱ्या आईला आकाशात विहार करता येत नाही, ती घरीच असते. माझ्या पत्नीविषयी काय सांगू ? ती प्रसव झाली आहे. सात दिवस झाले आहेत. या सर्वांचे पालन करणे माझी जबाबदारी आहे . तू माझा घात करण्याची योजना आखत आहेस. हे हंस पक्षाचे मनोगत एकून राजाच्या मनात दया निर्माण झाली. मग म्हणाला विहार जा अथवा फिर जा असे म्हणून हंस पक्ष्याची सुटका करतो. हंस पक्षाला आनंद होतो . हंस पक्षी म्हणतो ‘ तू थोर दयासिंधू आहेस ’.

4

37. ‘आई’ या कवितेत फ. मु. शिंदे यांनी आईचे महत्व सांगितले आहे. आई एक नाव असत घरातल्या घरात गजबजलेल गाव असते . ती जेव्हा असते तिची जाणीव असत नाही. नसली तर नाही म्हणवत नाही.आई मनामनात जाते ठेवून काही जिवाच जिवालाचं कळाव असे देऊन काही. आई एक धागा असतो वातीला उजेड दावणारा समईतला जागा. असते तेव्हा घर उजळत तेव्हा तिच नसत भान, अंधारात विझून गेली की सैरावैरा धावायला ही कमी पडत रान, आई आणि मुलांचे नात , प्रेम, गाय आणि वासरू. आई लेकरांची माय असते . वासराची गाय असते , दुधाची साय असते, लंगडयाचा पाय असते. धरणीची ठाय असते. आई नसते तेव्हा घरातल्या घरात डबडबलेल गाव असते. 4

38. निष्ठा ही कविता प्रदीप पाटील यांनी लिहीलेली आहे. शेतकऱ्यांची शेतीवर असणारी निष्ठा स्पष्ट केली आहे. वारकऱ्याचा नेम चुकल वारीचा पण बापाचा शेतात जायचा नेम चुकत नाही. गाव पहाटे स्वप्नात असते त्यावेळी बाप रानात असतो. व्यवहारी जगाच्या सर्व प्रश्नापासून शेकडो मैल दूर असतो. आटींग्यावनासारखा. उगवत ते माझ आणि सापडत ते दुसऱ्यांच, कष्टांच ते माझ बिनकष्टांच दुसऱ्यांच ही नीती आहे. जगण जरी मातीमोल होण्याची वेळ आली तरी शेतीवरची निष्ठा कमी होत नाही. पेरायला आल ,दार मोडायला आल की सगळ व्यवस्थित होत ही त्याची शिकवण. राना बरोबर माणसं पेरायला शिकलो. आता रानात पीक मावत नाही. माणुसकी मात्र उगवता उगवत नाही.

4

39. जीव माझा गुतंलाय या कवितेत आई आणि लेकीचे नाते उलगडून दाखविले आहे. आई वाकळ शिवत आहे. त्यावेळी बाळी अत्यंत लहान आहे. आईचे सारख लक्ष बाळीकडे असते. बाळी राजस केळी सोनसावळी सारखी आहे. तिच्या पाऊल खुणांनी जोत, अंगण, दिंडी दरवाजा सजलेला आहे. आता बाळी मोठी झाली. विहीरवर पाणी आणण्यासाठी, ओढ्याच्या काठी धुंण धुण्यासाठी जाते पण तिची नजर पायावरच असते. तिच्या रुपान गुणान शिवारातील माणस, पिंपळ पारावरील माणस कौतुक करतात. साता समुद्रापलीकडील गुणवंता येतो. बाळीला पसंत करतो. विवाह होतो. बाळी आणि गुणवंता यांची जोडी पाहून राम सीतेची आठवण आईला होते. डोळ्याच पारण फिटते . बाळीचे कुटुंब एकत्र . दहा जणाच्या स्वभावात बाळी नांदते नवरा तिला फार जपतो. आईचा जीव बाळीत गुंतलेला आहे. 4

ई) खालील पैकी कोणत्याही दोन प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. 5

40. पाझर ही कथा लेखक राजन गवस यांनी लिहीलेली आहे. या कथेतील जैतुनबी अत्यंत मन मिळाऊ प्रेमळ व कष्टाने जीवन जगणारी आहे. जैतुनबीचा नवरा लवकरच मरण पावतो. त्यावेळी बाबल आणि हासन ही दोन लहान मुले असतात. ती दोघांना शिक्षण देते. लहानच मोठ करते हासन मोठा झाल्यावर जैतुनबी बरोबर भांडण करून घर सोडून कोल्हापूर राहायला जातो. जैतुनबी बाबल मोठे करते. बाबल वडिलांचे सल्ला घालण्याचे काम करतो. सायकल वरून बनपाव विकण्याचा व्यवसाय . तर जैतुनबी कांकणाचा व्यवसाय . गावोगावी जात कांकण विकूण त्यातून मिळणाऱ्या पैशातून संसार चालवित असते. तिला वाटते आपण या गावची लेक आहे. मला काही कमी पडणार नाही. गावचे लोक तिला भाभी या नावाने हाक मारत बाबलला गावातील पोरं मारतात. गोंदा पाटील न्याय देतो. त्यावेळी तिच्या डोळ्यातून पाझर फुटतो. तिच्या डोळ्यातील पाझर पाहून गावातल्या सर्व लोकांच्या डोळ्यातून पाझर फुटतो.

5

41. पाझर या कथेतील बाबल बनपाव विकण्याचा व्यवसाय करत असतो तसेच सल्ला घालण्याचे काम करत असतो. सगळ्यांना दादा , मामा आपुलकीने, जिव्हाळ्याने बोलवत . गावचे लोकही त्याचे कौतुक करतात. एक दिवस संसदेवर अतिरेकी हल्ला करतात. आबा पाटलाच्या जोत्यावर गावातील पोरं बातम्या एकत असतात. तिच तिच चित्रे, त्याच त्याच बातम्या ते पाहून पोरांच्या मनात राग निर्माण होतो. दुसऱ्या दिवशी बाबल बनपावचे डबे सायकला लावून विकण्यासाठी जात असतो. मारूतीच्या देवळा जवळ नेहमीच गॅंग बसलेली. मान्याच पोर पळत गेल. सायकल अडवली. पारा जवळ आणल. बाबल तुझ्या भाऊबंदानी काय केल बघितलस. बाबलला काहीच समजल नाही, वडा म्हटंल्या बरोबर पोरांनी बाबलची सायकल आपटली. दोघे तिघे अंगावर धावले. बाबलने गोंदा पाटलांचे घर गाठल. गावात चर्चा सुरू झाली. गोंदा पाटलांन पंचाना बोलविले . सगळ गाव जमल. मारणारी पोर ही आली . ‘ बाबल का मारला? ‘ पण त्याच उत्तर नव्हत. गोंदा पाटलांन बाबलच्या कुटुंबाचा इतिहास सांगितला. मारण्याऱ्या पोरांना जैतुनबीचे पाय धरायला लावले. माफी मागायला सांगितले तरच सुटका अशाप्रकारे गोंदा पाटलान न्याय मिळवून दिला.

42. गळफास ही कथा अप्पासाहेब खोत यांनी लिहलेली आहे. व्यसनामुळे कुटुंबाला कसा गळफास लागतो हे सांगितले या कथेतील पंडीत विलासकाका व अजंना एकूलता एक लाडाने वाढलेला पंडीत कॉलेजमध्ये शिकेल म्हणून घातला. दोन वर्ष नापास झाला. गावात आला. उनाड पोरात राहू लागला. पंडिताला गुटखा खायची सवय, मटण, दारू पिण्याचे व्यसन, रोज धाब्यावर जेवायला जायच, मटका खेळायंच, गावातील पोरींची कळ काढणे , डान्स बारला जाणे. पैसे उडविणे, दारू पिणे, कर्ज काढणे, पैसे उधळणे, आई वडिलांचा आदर न करणे, शेतावर कर्ज काढणे, शेती नावावार करणे, आई वडीलांना न सांगता मोटर सायकल कर्ज काढून घेणे, चैनी करणे फिरणे इत्यादी वाईट सवयी पंडिताला लागल्या होत्या.

43. पंडिताला स्पेंडर मोटार सायकल हवी असते. पण ती घेण्यासाठी विलास काकाकडे तेवढे पैसे नसतात. पंडीत राजमाता पत संस्थेचा कर्जाचा फॉर्म घेऊन येतो व विलासकाकांना सही करण्यास सांगतो. पण विलास काकांना कर्ज काढून मोटार सायकल घेणे पटत नाही. ते सही करण्यास नकार देतात. तस गळफास लावून घेईन पंडीत म्हणतो. शेवटी विलास काका कर्जाच्या फॉर्मवर सही करतात. पंडिताचे व अंजनाचे वागणे विलास काकांना पटत नाही . मग त्यांना आईची आठवण येते. आई म्हणत, कर्ज काढून कुणब्याचा संसार वर येत नाही. बुडत्याचा पाय खोलात जातो. माणसानं जमेल तेवढेच कराव. झेपल तेवढच ओझ उचलाव, प्रतिष्ठेने जगाव. शोभेल असा पोषाख घालावा. पचेल तेच खावाव, कष्ट न करता जे मिळते ते जास्त दिवस टिकत

नाही. ज्या वाटेने येते त्याच वाटेने जाते. कोणालाही वाईट शब्द बोलू नये. जे मिळते ते सुखाने खावे. समाधानी रहावे. गर्वाने रावणांच राज्य गेले. अंहकाराने अनेकाचे खून झालेत.  पाळत्याच्या पाठीमागे लागू नये आताचे दिवस चांगले नाहीत. सांभाळून जगावं, आईचा एक एक शब्द आठवत होता.

उ. खालील दिलेल्या विषयावर अर्ज लिहा( कोणताही एक )　　　　5

44.

नाव  अ.ब. क.
मु.पो. बाची , ता. बेळगाव
जि. बेळगाव, राज्य . कर्नाटक
ता. 25.04.2022

प्रति,
प्राचार्य,
कर्मवीर भाऊराव पाटील पदवीपूर्व महाविद्यालय,
बागेवाडी.

विषय : इतिहास विषयाच्या पदाबाबत.
संदर्भ : दै. सकाळ दि. 15.04.2022 ची जाहिरात.

महोदय,

आपण दिलेली जाहिरात वाचून मी अर्ज करीत आहे. माझी वैयक्तीक व शैक्षणिक माहिती खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| नाव | : | अ.ब.क. |
| पत्ता | : | मु.पो. बाची . ता. बेळगाव. जि. बेळगाव |
| जन्मतारीख | : | 19.05.2010 |
| जात | : | हिंदू– मराठा |

| शैक्षणिक माहिती | विषय | टक्केवारी |
|---|---|---|
| 1. बी.ए | इतिहास | 65. % |
| 2. बी.एड. | इतिहास , मराठी | 70% |
| 3. एम.ए. | इतिहास | 70 % |

अनुभव:

महाविद्यालयातील अध्यापनाचा एक वर्षाचा अनुभव आहे. जर मला आपल्या संस्थेत नोकरी करण्याची संधी मिळाली तर मी प्रामाणिकपणे कार्य करीन . तरी माझ्या अर्जाचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा ही विनंती.

आपला
अ.ब.क.

45. 5

समस्त गावातील गावकरी,
मु.पो. बेळगुंदी, ता. बेळगाव,
जि. बेळगाव.
ता. 22.04.2022

प्रति,
अध्यक्ष,
बेळगुंदी ग्रामपंचायत कार्यालय
ता. व जि. बेळगाव

विषय : गावातील नळांना नियमितपणे पाणी येण्याच्या संदर्भात

महोदय,
आपल्या गावातील पिण्याच्या नंळाना गेली पाच दिवस पाणी आलेले नाही. त्यामुळे गावकऱ्यांना त्रास होत आहे. पिण्याचे पाणी आणण्यासाठी गावापासून पाच कि. मी. अंतरावरील विहीरीतून पाणी आणावे लागत आहे. विद्यार्थ्यांना पाणी आणावे लागत असल्यामुळे विद्यार्थी शाळेला जात नाहीत. जनावरांचे हाल होत आहेत. पाणी आणण्यासाठी गावकऱ्यांचा फार वेळ जात असल्यामुळे शेतीची कामे तशीच आहेत. तरी लवकरात लवकर नळांना पाणी नियमीत चालू करावे ही विनंती.

अर्जदार
गावकरी मंडळी.

1. अ.ब.क.
2. अ.ब.क.
3. अ.ब.क.
4. अ.ब.क.
5. अ.ब.क.

ब. अधोरेखीत शब्दांच्या विभक्ती ओळखा

| | | | |
|---|---|---|---|
| 46. अशोक | – | प्रथमा विभक्ती | 1 |
| 47. रमेशने | – | तृतीया विभक्ती | 1 |
| 48 मुंबईहून | – | पंचमी विभक्ती | 1 |
| 49. मनात | – | सप्तमी विभक्ती | 1 |
| 50 मुलांनो | – | संभोधन विभक्ती | 1 |

क. खालील वाक्यप्रचारांच्या योग्य जोड्या जुळवा

51. काना डोळा करणे – दुर्लक्ष करणे 1

52. पदर पसरणे – याचना करणे 1

53. क्षमा करणे – माफ करणे 1

54 माती मोल होणे – नाहीसे होणे 1

55. पारा चढणे – खूप राग येणे 1

ड. खालील कंसात दिलेले योग्य शब्द जोडून म्हणी पूर्ण करा.

56. यथा राजा तथा प्रजा 1
57. पेरावे तसे उगवते 1
58. नाकापेक्षा मोती जड 1
59. घरोघरी मातीच्या चुली 1
60. दुरून डोंगर साजरे 1

इ. जोडया जुळवा.

61. दुसऱ्याच्या मनातले ओळखणारा – मनकवडा 1
62. दगडावर कोरलेले लेख – शिलालेख 1
63. पुरामुळे नुकसान झालेले लोक – पूरग्रस्त 1
64. कोणाचाही आधार नसलेला – निराधार 1
65. खूप दानधर्म करणारा – दानशूर 1

ऊ. उतारा वाचून खालील दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा

66. समाजाला सुधारण्याचे सामर्थ्य विनोदात आहे. 1

67. सुदाम्याच्या पोह्यांना विनोदाची खमंग फोडणी दिली आहे. 1

68. समाजातील अनेक वेडगळ समजुती आणि चालीरितीचे सुंदर विडंबन केले आहे. 1

69. श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांची विनोदी परंपरा राम गणेश गडकरी यांनी पुढे चालविली 1

70. लेखक गडकरी यांची वर्णिलेली वर्णने वाचताना,‘डोळ्यात आसू आणि ओठात हसू ’असा अनुभव येतो. 1